# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ४८/२०२२

या परिपत्रकाद्वारे सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, कोव्हीड–१९ (कोरोना) या विषाणूचा प्रादुर्भाव कमी होत असल्याकारणाने व पीएच.डी. तसेच स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांना स्वतंत्र खोल्या असल्याने, सोमवार दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२ पासून पीएच. डी. व स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू करण्यात येत आहेत.

वसतिगृहात प्रत्यक्ष राहण्यास येण्याअगोदर कोव्हीड प्रतिबंधक लशीचे दोन्ही डोस घेतलेले असणे आवश्यक आहे तसेच कोव्हीड–१९ व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निर्देश, राज्य शासनाने वेळोवेळी काढलेली मार्गदर्शक तत्वे किंवा मानक कार्यप्रणाली (एसओपी), विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना तसेच मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका व मा. जिल्हा अधिकारी, पुणे यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

तसेच विद्यापीठ परिसरातील इतर वसतिगृहे देखील ५०% क्षमतेने सुरू करण्यात येत आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

कुलसचिव<br>
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ<br>
पुणे–०७

**गणेशखिंड, पुणे – ४११ ००७**<br>
**सा.फु.पु.वि/वसतिगृह/२०२१–२२/८५१**<br>
**दिनांक :– १६/०२/२०२२**

**<u>प्रत माहितीसाठी सादर</u> :–**

**मा. विभागप्रमुख :– आपल्या विभागातील विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणून द्यावे, ही विनंती.**